आज रक्षाबंधन

दैनिक
# दिव्य मराठी
महाराष्ट्राचे एकमेव निःपक्ष आणि स्वतंत्र वृत्तपत्र

divyamarathi.com

जळगाव

रविवार, २६ ऑगस्ट २०१८



# पूरग्रस्तांसाठी विद्यार्थ्यांनी जमवला आठ हजार निधी

**प्रतिनिधी । बोदवड**

केरळमधील पूरग्रस्तांसाठी बोदवड शहरातील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नुकतिच मदत फेरी काढली. या उपक्रमात एकूण ८ हजार ४०० रुपयांचा निधी संकलित झाला आहे. हा निधी जिल्हाधिकाऱ्यांच्या माध्यमातून पूरग्रस्तांकडे पाठवला जाणार आहे.

प्राचार्य अरविंद चौधरी यांनी दोन हजार रुपये निधी देऊन मदत फेरीची सुरुवात केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रमुख डॉ. चेतन शर्मा, प्रा. नीतेश सावदेकर, प्रा.कांचन दमाडे यांच्यासह शंभर स्वयंसेवकांनी गावातून मदत फेरी काढून शहरवासीयांना मदतीचे आवाहन केले. पूरग्रस्तांच्या मदतीसाठी बोदवड एज्युकेशन संस्थेचे चेअरमन मिठूलाल अग्रवाल यांनी मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला. उपप्राचार्य डी.एस.. पाटील, डॉ.मधू खराटे, डॉ.मनोज निकाळजे, डॉ. प्रभाकर महाले, प्रा. हेमलता कोटेचा, डॉ. विनोद चौधरी, डॉ.रुपेश मोरे, प्रा.गीता पाटील, नीलेश महाजन, नामदेव बडगुजर, विशाल माळी, अमीन शाह, शुभांगी चौधरी यांनी सहकार्य केले. बोदवड शहरवासीयांनी या उपक्रमाचे स्वागत केले.

## बोदवड महाविद्यालयाने काढली मदत फेरी




बोदवड महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी पूरग्रस्तांसाठी काढलेली मदत फेरी, या उपक्रमाला प्रतिसाद लाभला.

## भुसावळ शहरातूनही दिला मदतीचा हात

केरळमधील पुरग्रस्तांसाठी भुसावळातील कोटेचा परिवाराने ५०१ रूपयांची आर्थिक मदत केली. आर्थिक मदतीचा धनादेश संगीत बहु मंडळाच्या अध्यक्षा विमल कोटेचा, जे.बी.कोटेचा, कविता चोरडिया, गौतम चोरडिया यांच्या उपस्थितीत डाक विभागाकडे सुपूर्द करण्यात आला. या उपक्रमाचे स्वागत केले जात आहे.